सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक- बियुडी- ११२५/ प्र. क्र. १४६/आस्था -१, दि.१७/०२/२०२६

**विषय**:- पोलीसांना घरबांधणी अग्रीम योजनेंतर्गत बॅकामार्फत घेतलेल्या कर्जाच्या व्याजातील फरकाची रक्कम अदा करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक- बियुडी- ११२५/प्र. क्र.१४६/आस्था -१, दि.१७/०२/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२१७१७०८३९९०२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 18-02-2026 15:54:15

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
कार्यासन अधिकारी, का क्र.३१

प्रत,
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (लेखा).

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पोलीसांना घरबांधणी अग्रीम योजनेंतर्गत बँकामार्फत घेतलेल्या कर्जाच्या व्याजातील फरकाची रक्कम अदा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बियुडी-११२५/प्र.क्र.१४६/आस्था-१**
नवीन प्रशासकीय भवन, १२ वा मजला
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक :- १७ फेब्रुवारी, २०२६**

**वाचा:-**

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं २०२५/प्र. क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५
२) पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांचे पत्र क. पोगृम/वित्त व लेखा शाखा / गृहबांधणी अग्रिम २०२५-२६/११५३/२०२५, दि.१७.०४.२०२५.
३) शासन निर्णय क्रमांक: व्याजफ ०५२५/प्र.क्र.६०/आस्था-१, दिनांक ०४.०७.२०२५.

**प्रस्तावना :-**

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे कार्यालयास सन २०२५-२०२६ या वर्षामध्ये पोलीसांना घरासाठीच्या कर्जावरील व्याजातील फरकाची रक्कम अदा करण्यासाठी १००% म्हणजे रु.१०३,६३,४६,०००/- (अक्षरी रुपये एकशे तीन कोटी, त्रेसष्ट लाख सेहेचाळीस हजार फक्त) निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली होती. त्यापैकी ६० टक्के रक्कम रुपये ६२,१८,०७,६००/- इतकी रकमेचा निधी शासन निर्णय, गृह विभाग, क्र. व्याजफ ०५२५/ प्र.क्र.६०/आस्था-१, दिनांक ०४.०७.२०२५ द्वारे वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. बँक ऑफ महाराष्ट्र यांनी दि.२०.०१.२०२५ पासून व्याजदरात वाढ केल्याने बँकेचा मासिक हप्ता वाढ झाली आहे. त्यामुळे वर्ष २०२५-२६ वित्तीय वर्षावरील घरबांधणी अग्रीम अंतर्गत व्याजाच्या फरकाची रक्कम अदा करणेकरीता पुरवणी मागणीद्वारे मंजुर करण्यात आलेल्या रु.२.६२ कोटी नुसार एकूण रु.१०६,२५,४६,००० /- इतक्या रकमेची सुधारित अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे, उक्त प्रयोजनासाठी वित्तीय वर्ष २०२५-२६ मध्ये उर्वरित ४० टक्के निधी उक्त कार्यालयास उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णयः-</u>**

वित्तीय वर्ष २०२५-२६ करीता मागणी क्र. बी-१, मुख्य लेखाशिर्ष २०५५A०८८, ५०-इतर खर्च “पोलीसांना घरासाठीच्या कर्जावरील व्याजातील फरकाची रक्कम अदा करणे" या प्रयोजनासाठी एकूण रु.४४,०७,३९,०००/- (अक्षरी रुपये चव्वेचाळीस कोटी, सात लक्ष, एकोणचाळीस हजार फक्त) इतका निधी पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्या कार्यालयास वितरीत करण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च “मागणी क्र. बी-१, मुख्य लेखाशिर्ष २०५५A०८८, ५०-इतर खर्च, पोलिसांना घरासाठीच्या कर्जावरील व्याजातील फरकाची रक्कम अदा करणे" या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर निधी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून काढून संबंधितांना प्रदान करण्याच्या प्रयोजनासाठी पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी यांना आहरण संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेचा ताळमेळ, महालेखापाल यांच्या कार्यालयाने नोंदविलेल्या खर्चाशी महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण १४ मधील नियम १५७ च्या परिशिष्ट-३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करून त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहित मुदतीत पाठविण्यात यावी. खर्चमेळाची माहिती महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करून पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुखांची राहील.

५. सदर अनुदान वित्त विभागाच्या शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२५/प्र. क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५ रोजीच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून उपलब्ध निधीच्या मर्यादेत खर्च करणे बंधनकारक राहिल.

६. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ३५६/२०२५/व्यय-८, दि.१९.०६.२०२५ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०२१७१७०८३९९०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAKASH BABANRAO GHADGE

Digitally signed by PRAKASH BABANRAO GHADGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=2F90259E87B0960801EDC01F52214FF1B58C7E3C653FB93BEF856FB92941B9D7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=77E1EBA3AEC9A0675410DB6FA1A645387767189322F02B94733DEF91397C59A0, cn=PRAKASH BABANRAO GHADGE
Date: 2026.02.17 17:09:33 +05'30'

**(प्र. ब. घाडगे)**
**अवर सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री (गृह-शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. राज्यमंत्री (गृह-ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
८) पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित्त, वरळी, मुंबई.
९) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), १/२, नागपूर / मुंबई.
१०) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परीक्षा), १/२, नागपूर / मुंबई.
११) सह सचिव, पोल-७, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) उप सचिव, अर्थ-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) अवर सचिव, अर्थसंकल्प-३/व्यय-८, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६) निवडनस्ती, आस्था-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

* * * * * *